**नियमित दिवाणी दावा क्र.२६/२००९**
**सुरेखाबाई व इतर वि. पांडुरंग व इतर**

## आदेश निशाणी ५० खाली

**१.** वादीने प्रस्तुतचा अर्ज मयत प्रतिवादी क्र.१ पांडुरंग महादु पाटील यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** वादीचे कथन आहे की, सदरचा दावा चालु असताना प्रतिवादी क्र.१ पांडुरंग महादु पाटील हे दि.२८/१२/२०२४ रोजी मयत झाले आहेत. त्याबाबत वादीने त्यांचा मृत्यू दाखला मिळवला आहे. त्याचे मृत्यूप्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले आहे. त्यानुसार प्रतिवादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. प्रतिवादी क्र.१ हे मयत झाल्यानंतर त्याचे पश्चात त्यांना एक पत्नी, दोन मुले व एक मुलगी असे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल करुन प्रतिवादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्याची व तशी दुरुस्ती करण्याची विनंती केलेली आहे. सदर मयतास वारस खालीलप्रमाणेः-

१) श्रीमती सुनंदा पांडुरंग पाटील, वय- सज्ञान,
२) प्रशांत पांडुरंग पाटील, वय- सज्ञान,
३) विनांद पांडुरंग पाटील, वय- सज्ञान,
४) सौ. शुशमा सुधीर पाटील, वय- सज्ञान,
क्र.१ ते ३ रा. भडगाव शेत किसानचे मागे, ता.भडगाव, जि.जळगाव
क्र. ४ रा. हिंगोणे, ता.चाळीसगाव, जि.जळगाव

३. प्रतिवादी तर्फे खुलासा मागविण्यात आला असुन प्रतिवादी क्र.२ चे विधिज्ञांनी त्यांचा खुलासा प्रस्तुत अर्जावर दाखल करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. त्यांचे मते नि.नं. ५० चे अर्जावर वादीची सही नाही, वादीचे प्रतिज्ञापत्र नाही, तिन महिन्याचे आत अर्ज दाखल नाही, विलंब माफीचा अर्ज दाखल नाही तसेच सदरचा अर्ज कोणत्या कायद्यानुसार दाखल केला आहे. ते नमुद नाही.

४. वादी व प्रतिवांदीतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध दस्तांची बारकाईने अवलोकन कले. वादीने अभिलेखावर प्रतिवादी क्र.१ पांडुरंग महारु पाटील यांचे मृत्यूप्रमाणपत्राची प्रत दस्तऐवज यादी निशाणी ४९ सोबत दाखल केली आहे. त्यानुसार पांडुरंग महारु पाटील यांचे दि.२८/१२/२०२४ रोजी नाशिक येथे निधन झाल्याचे दिसुन येते.

५. वादीने प्रस्तुतचा दावा गहाण मुक्तीचा व निरंतर मनाई हुकुमासाठी दाखल केलेला आहे. तसेच पांडुरंग महारु पाटील याचा मृत्यू दिनांक २८/१२/२०२४ रोजी झाला असुन वादीने प्रस्तुतचा अर्ज दि.११/०३/२०२५ रोजी दाखल केलेला आहे. मुदत कायद्यानुसार वारस रेकॉर्डवर घेण्याचा अर्ज मुदतीत असल्याचे दिसुन येतो. पांडुरंग महारु पाटील  मयत झाले असले तरी त्यांच्या वारसाविरुध्दचा वादीचा दाव्याचा हक्क जिवंत आहे. त्यामुळे मयताच्या वारसांना रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१. वादीचा सदरचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादीने दाव्यात प्रतिवादी पांडुरंग महारु पाटील यांचे वारस १)श्रीमती सुनंदा पांडुरंग पाटील, २) प्रशांत पांडुरंग पाटील, ३)विनांद पांडुरंग पाटील आणि ४) सौ. शुशमा सुधीर पाटील यांना वारस म्हणुन पुढील तारखेपर्यंत समाविष्ट करावे व तशी दुरुस्तीप्रत त्वरीत दाखल करावी.

**स्वा/–**

दि.०५/०८/२०२५

(श्रीमती प्रा.वि. राजळे)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भडगाव

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file judgment are same word for word as per original judgment.

| | |
|---|---|
| Name of Court | :- Smt. P.V. Rajale, C.J.J.D. & JMFC, Bhadgaon |
| Name of Steno | :- M.P. Wani, Stenographer Gr.III |
| Date of Decision Judgment | :- 05/08/2025 |
| Signed by Presiding Officer On | :- 05/08/2025 |
| Judgment upload on | :- 06/08/2025 |